**महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर**

**राज्यशास्त्र विभाग**


**स्वच्छ सर्वेक्षण अभियान अहवाल**

**शनिवार, 1 मार्च 2025**

आज शनिवार, दि. 1 मार्च 2025 रोजी कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना **(N.S.S.),** वाणिज्य, राज्यशास्त्र विभाग आणि इस्लामपूर नगरपालिका, इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘स्वच्छ सर्वेक्षण अभियान’ हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमा दरम्यान आपल्या जीवनातील स्वच्छतेचे महत्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या दैनंदिन जीवनातील स्वच्छतेचे महत्व पटवून सांगत असताना आपण आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे व कोणत्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत हे स्पष्ट करण्यात आले. आपल्या स्वच्छतेबरोबरच आपल्या आसपास असणाऱ्या पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगण्यात आले. प्लास्टिकचा वापर करण्याऐवजी आपण कापडी साधनांचा वापर करण्याविषयी प्रबोधन करण्यात आले. या उपक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना **(N.S.S.)** विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश आठवले, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. चंद्रकांत भारसकळे आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे यांनी केले होते. या उपक्रमात सुमारे 77 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409







स्वच्छतेविषयी माहिती सांगताना मान्यवर




स्वच्छतेविषयी माहिती सांगताना मान्यवर




स्वच्छतेविषयी माहिती सांगताना मान्यवर